ePaper

# “पुढाऱ्यांनी राजकारण करू नये तर गोलगप्पे विकावे?”: कंगना




॥ वर्ष - 8 । अंक - 13 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ गुरुवार, दिनांक 18 जुलै 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews


## आतील पानांत


- या' ॲपवर पाहता येणार लाईव्ह सामने!
- श्रीलंका दौऱ्यासाठी इंडियाची घोषणा
- भोले बाबांकडून असंवेदनशीलतेचा कळस
- अग्निवीरांसाठी १० टक्के आरक्षण


## आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर

# अजितदादांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग

### पिंपरी चिंचवडमधील 2 माजी महापौरांसह अनेक माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश



। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवडला सुरुंग लागला आहे. अजित पवार यांचे कट्टर समर्थक असलेले अजित गव्हाणे यांच्यासोबत दोन माजी महापौर आणि २० माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे, पिंपरी चिंचवड शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलाक्षणा शिलवंत आदी उपस्थित होते.

### प्रवेश केलेल्या माजी नगरसेवक, पदाधिकारी यांची नावे

०१) हणमंतरावजी भोसले, माजी महापौर
०२) वैशालीताई घोडेकर, माजी महापौर
०३) पंकज भालेकर, माजी नगरसेवक
०४) प्रवीण भालेकर, माजी नगरसेवक
०५) संगीतानानी ताम्हाणे, माजी नगरसेविका
०६) दिवंगत नगरसेविका पौर्णिमाताई सोनवणे यांचे पती रवी आप्पा सोनवणे
०७) यश साने
०८) संजय नेवाळे, माजी नगरसेवक
०९) वसंत बोराटे, माजी नगरसेवक
१०) विनयाताई तापकीर, माजी नगरसेविका
११) राहुल भोसले, माजी नगरसेवक
१२) समीर मासुळकर, माजी नगरसेवक
१३) गीताताई मंचरकर, माजी नगरसेविका
१४) संजय वाबळे, माजी नगरसेवक
१५) वैशालीताई उबाळे
१५) शुभांगीताई बोराडे, माजी नगरसेविका
१६) अनुराधा गोफने, माजी नगरसेविका
१७) घनश्याम खेडेकर, माजी नगरसेवक
१८) युवक राष्ट्रवादी भोसरी विधानसभा अध्यक्ष सागर बोराटे
१९) शिक्षण मंडळाचे माजी सभापती निवृत्ती मामा शिंदे
२०) तानाजी खाडे, माजी नगरसेवक
२१) शशिकीरण गवळी, माजी नगरसेवक
२२) युवराज पवार कामगार आघाडी
२३) विशाल आहेर सरचिटणीस पिंपरी चिंचवड शहर जिल्हा
२४) नंदूतात्या शिंदे
२५) शरद भालेकर

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांना हा त्यांच्याच बालेकिल्ल्यात मोठा धक्का मानला जात आहे काल राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह पक्षाच्या पदाचे राजीनामा दिले होते. त्यानंतर आज अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वात शहरातील दोन माजी महापौरांसह २० माजी नगरसेवकांनी शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील पक्षाची पडझड रोखण्यासाठी अजित पवार यांची तातडीची बैठक!

### नवीन शहराध्यक्ष पदाबाबत चर्चा आणि ‘आउटगोइंग’ रोखण्यासाठी ‘ॲक्शन प्लॅन’

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवड मध्ये सुरुंग लागला आहे. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह भोसरी विधानसभेतील अनेक माजी नगरसेवकांनी अजित पवारांची साथ सोडत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला आहे.



आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही पडझड रोखण्यासाठी अजित पवार आता ‘ॲक्शन मोड’मध्ये आले आहेत. त्यांनी सुरू असलेली आउटगोइंग रोखण्यासाठी आणि नवीन शहराध्यक्ष पदाबाबत चर्चा करण्यासाठी उद्या (दि.१८) सकाळी ८ वाजता पुण्यातील नवीन सर्किट हाऊस येथे आजी, माजी नगरसेवकांसह सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली असल्याची माहिती मिळत आहे.

### नवीन शहराध्यक्ष पदाकरिता चर्चा

तसेच नवीन शहराध्यक्ष पदाकरिता माजी महापौर योगेश बहल, माजी विरोधी पक्ष नेते नाना काटे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, जगदीश शेट्टी यांच्या नावावर चर्चा होऊ शकणार आहे.

सूत्राने दिलेल्या माहितीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उद्या पुण्यात पिंपरी चिंचवड शहरातील माजी नगरसेवक तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. सध्या भोसरी विधानसभेतील बरेच पदाधिकारी व माजी नगरसेवक यांचा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश झाला आहे. त्याच अनुषंगाने सुरू असलेली ही पडझड रोखण्यासाठी पक्ष संघटना टिकवण्यासाठी उपाययोजना यावर चर्चा केली जाणार आहे.

# ती बारामती आहे बाबा!: शरद पवार

## दादांचा बारामतीत विकास पण मतदारांची शरद पवारांना साथ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेतील देदिप्यमान यश, पक्षफुटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणावर झालेला परिणाम, राज्यातली सामाजिक अस्थिरता, आरक्षणविषयक प्रश्नांनी जनमानसांत असलेली अस्वस्थता, नुकतीच पार पडलेली विधान परिषद निवडणूक अशा प्रश्नांना शरद पवार यांनी पुण्यातील पत्रकार परिषदेत उत्तरे दिली.**



देशातील प्रतिष्ठित लढतींपैकी एक मानली जाणारी बारामती लोकसभेची लढत सुप्रिया सुळे यांनी जिंकून सुनेत्रा पवार यांना पराजयाचे पाणी पाजले. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी जरी लढत झालेली असली तरी खरी लढत काका शरद पवार विरुद्ध पुतण्या अजित पवार यांच्यातच मानली जात होती. अजितदादांचा विकासाचा वादा विरुद्ध शरद पवार यांना पक्षफुटीमुळे मिळत असलेली सहानुभूती अशा प्रमुख मुद्द्यांवर झालेल्या निवडणुकीत मतदारांनी शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सुप्रिया सुळे यांना साथ दिल्याने अजित पवार यांचे बारामतीतच पानिपत झाले. याच पार्श्वभूमीवर शरद पवार यांना पुण्यातील पत्रकारांनी अनेकानेक संदर्भांनी प्रश्न विचारून बोलते करण्याचा प्रयत्न केला.

पुणे श्रमिक पत्रकार संघाकडून आयोजित 'वार्तालाप कार्यक्रमा'त ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विविध प्रश्नांना दिलखुलास आणि अतिशय मनमोकळेपणाने उत्तरे दिली. लोकसभेतील देदिप्यमान यश, पक्षफुटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणावर झालेले परिणाम, राज्यातली सामाजिक अस्थिरता, आरक्षणविषयक प्रश्नांनी जनमानसांत असलेली अस्वस्थता, नुकतीच पार पडलेली विधान परिषद निवडणूक अशा प्रश्नांना पवार यांनी उत्तरे दिली

अजित पवार यांचे बारामतीतील विकासाचे मॉडेल राज्यात चर्चेचा विषय आहे. पण असे असतानाही बारामती लोकसभेच्या मतदारांनी त्यांना नाकारून सुप्रिया सुळे पर्यायाने तुमच्या नेतृत्वावर का विश्वास ठेवला असावा? असा प्रश्न पत्रकारांनी पवार यांना विचारला असता ते म्हणाले, अरे ती बारामती आहे बाबा.... पवार यांच्या नेमक्या उत्तराने एकच हशा पिकला. त्यांना स्वत:लाही हसू आवरता आले नाही. लोकशाही प्रक्रियेत संवाद सगळ्यात जास्त महत्त्वाचा असतो. गेल्या दोन पिढ्यांशी माझा उत्तम संवाद होता. मतदारसंघातील अनेक लोकांना मी नावानिशी ओळखत होतो. त्यातील अनेक माणस आता हयात नाहीत. परंतु माझा बऱ्याच लोकांशी संवाद होतो. मला खात्री होती की लोक सुप्रिया सुळे यांनाच मतदान करतील, असे शरद पवार म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आरक्षण प्रश्नावर सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली होती. विरोधी पक्षातील महत्त्वाचे नेते बैठकीला येणार होते. पण बारामतीमधून एक फोन गेल्यांनी त्या नेत्यांनी दांडी मारली, अशा शब्दांत भुजबळांनी रविवारी बारामतीत झालेल्या जाहीर सभेतून पवारांना लक्ष्य केलं. या टिकेला २४ तास उलटत नाही तोच भुजबळ मुंबईतील पवारांच्या निवासस्थानी त्यांच्या भेटीसाठी पोहोचले. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

### आता माझ्या मार्गदर्शनाची गरज भासतेय!

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी मुंबई शरद पवारांची भेट घेतली. राज्यात जातीय तणाव निर्माण झाला असून तो दूर करण्यासाठी शरद पवारांनी पुढाकार घ्यायला हवा, असं आवाहन भेटीतून केल्याची माहिती भुजबळांनी पत्रकार परिषद देत केली. आता यावर शरद पवारांनी भाष्य केलं आहे. भुजबळांसोबत झालेल्या संवादाचा तपशील शरद पवारांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत दिला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आरक्षण प्रश्नावर सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली होती. विरोधी पक्षातील महत्त्वाचे नेते बैठकीला येणार होते. पण बारामतीमधून एक फोन गेल्यांनी त्या नेत्यांनी दांडी मारली, अशा शब्दांत भुजबळांनी रविवारी बारामतीत झालेल्या जाहीर सभेतून पवारांना लक्ष्य केलं. या टिकेला २४ तास उलटत नाही तोच भुजबळ मुंबईतील पवारांच्या निवासस्थानी त्यांच्या भेटीसाठी पोहोचले. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

भुजबळांनी भाषणातून केलेली टीका आणि त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी घेतलेली भेट यावर शरद पवारांनी पुण्यात भाष्य केलं. ' हल्ली त्यांची दोन, चार भाषणं छान झाली. बारामती आणि बीडमधलं त्यांचं भाषण छान झालं. त्यांनी माझ्या विषयी आस्था व्यक्त केली. भुजबळ आले होते. ते एक तास थांबले. भेटल्याशिवाय जाणार नाही म्हणाले. त्यांनी काही गोष्टी सांगितल्या.

### अजित पवार यांना पुन्हा पक्षात घेणार का?

अजित पवार यांना कुटुंबात स्थान असेल पण पक्षात असेल का याचे उत्तर मी सध्या देऊ शकत नाही. कारण अडचणीच्या काळात माझ्या सहकाऱ्यांनी मला साथ दिली. माझे सगळे सहकारी ज्यांनी संघर्षाच्या काळामध्ये पक्षाला मजबुतीने उभे केले, त्यांना विचारात घेऊन त्यांच्या सहमतीनेच निर्णय होईल, असे पवार म्हणाले.

# पशुधन वाचविण्यासाठी गोशाळा, पांजरपोळ संस्थांना अनुदान द्यावे!

## भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील पशुधन वाचविण्यासाठी गोमाता व पशुधन सुरक्षित ठेवणाऱ्या गोशाळा, पांजरपोळ यांसारख्या संस्थांना राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात यावे, अशी मागणी समस्त महाजन या संस्थेचे महाराष्ट्र राज्यातील १०८६ गोशाळांचे समन्वयक रमेशभाई ओसवाल यांचेशी झालेल्या चर्चे उपरांत पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.**



यासंदर्भात भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, "महाराष्ट्रातील पशुधन वाचवण्यासाठी शासनाकडून आजमितीस आर्थिक मदतीची कोणतीही तरतूद नाही. पशुधनाच्या संरक्षणासाठी अतिरिक्त संसाधनांची नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील १ हजार ६५ गोशाळा, पांजरापोळच्या माध्यमातून एक लाखांहून अधिक गोमाता व पशुधन सुरक्षित ठेवले जात असले तरी मोठ्या संख्येने पशुधन अजूनही भटकत आहे. कोणत्याही आधाराशिवाय रस्त्यावर भटकणे किंवा अपघात आणि बेकायदेशीर हत्या इ. यांचे संरक्षण करण्यासाठी सर्व संस्थांमध्ये पुरेशी क्षमता तयार करणे शक्य आहे. मात्र आज रोजी कोणतीही सुविधा व आर्थिक मदत नाही. पशुधनाचे संरक्षण करायचे असेल तर त्यासाठी गोशाळा आदि संस्थांना अतिरिक्त व्यवस्था करावी लागेल. यासंदर्भात शेड, चारा गोदामे, कंपाउंड, भिंती आणि कर्मचारी निवासस्थान यांसारख्या आवश्यक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी संस्थांना आर्थिक सहाय्य आवश्यक आहे. यासाठी ३०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा निधीची अत्यंत आवश्यकता आहे. पण सध्या महाराष्ट्र शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही. म्हणून पांजरपोळ, गोशाळा या संस्थांना कमीत कमी प्रती दिन १०० रुपये प्रति पशुप्रमाणे चारा, पाणी व उपचाराकरीता मदतीची नितांत आवश्यकता आहे. यासंदर्भात भारत सरकारच्या पशुकल्याण मंडळाने ३ मे २०१८ रोजी पांजरपोळ व गोशाळा यांना प्रति पशु २०० रुपये प्रमाणे अनुदान देण्याचे निर्देश राज्यांना दिलेले आहेत. निती आयोगाच्या मते १ हजार गायींसाठी गोशाळा चालवण्याचा एकूण खर्च जमिनीसह प्रतिदिन १ लाख १८ हजार १८२ रुपये आहे. जमिनीशिवाय हा खर्च ८२ हजार ४७५ रुपये प्रतिदिन आहे. पशुधन सुरक्षित राहिल्याने दुधाचे उत्पादन वाढेल व भेसळयुक्त दुधास आळा बसेल.

### गोभक्त परिवारांमध्ये आनंदाचे वातावरण

नैसर्गिक शेतीमुळे महाराष्ट्रातील जनतेला मोठा आर्थिक फायदा होईल. तसेच स्वास्थ्य लाभेल. पर्यावरणाला सुध्दा फायदा होइल. या महत्वाच्या विषयावर स्वतः लक्ष घालून महाराष्ट्रातील पशुधन वाचविण्यासाठी गोशाळा व पांजरपोळ यांसारख्या संस्थांना तातडीने अनुदान देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे."सदर केलेल्या मागणींमुळे मुळतः वारकरी संप्रदायाचे असलेले जगताप कुटुंबीय बद्दल सर्व सामान्य जनता व विशेषतः गोभक्त परिवारांमध्ये आनंदाचे व कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सर्वेक्षणात आढळणाऱ्या मालमत्तांच्या सुनावणीसाठी यंत्रणा सज्ज!

## 7 ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित; ऑफलाईन आणि ऑनलाईन सुविधा उपलब्ध

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील नवीन, वाढीव अशा मालमत्तांचे अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात आढळलेल्या मालमत्ता धारकांना विशेष नोटीसही तत्काळ देण्यात येत आहे. ज्या मालमत्ता धारकांचे कर आकारणीबाबत हरकत, आक्षेप असतील, अशा मालमत्ता धारकांच्या सुनावणीसाठी शहरातील विविध भागात सात ठिकाणी सर्व सुविधांयुक्त केंद्र निश्चित केली आहेत. ऑफलाईनसह ऑनलाईनचीही यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरात सध्यस्थितीत ६ लाख ३० हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. मात्र त्यानंतरही शहर परिसरात नोंदणी नसलेल्या सुमारे दोन लाख नवीन आणि वाढीव बांधकाम असलेल्या मालमत्ता आढळण्याचा महापालिका प्रशासनाचा अंदाज आहे. त्यामुळेच आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी नवीन, वाढीव अशा मालमत्तांचा अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण करण्याचा महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुसार मालमत्ता सर्वेक्षणासाठी महापालिकेने स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. कंपनीची नियुक्ती केली असून सर्वेक्षणास प्रारंभ झाला आहे.

सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन मालमत्ता धारकांना कर आकारणीबाबत पहिली विशेष नोटीस बजाविण्यात येत आहे. या नोटीसबाबत मालमत्ता धारकांची काही हरकत, आक्षेप असल्यास संबंधित झोन कार्यालयात लेखी तक्रार दाखल करता येईल. यासाठी महापालिकेने सात ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित केले आहेत. सुनावणीसाठी आक्षेप असलेल्या आपल्या मिळकतीची सर्व कागदपत्रे मालमत्ता धारकांनी आणल्यानंतर सुनावणी घेण्यात येणार आहे.




### ऑनलाईन सुनावणीचीही सुविधा

मालमत्ता धारकांसाठी सात ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित केली आहे. मात्र, अनेक मालमत्ता धारकांना प्रत्यक्ष सुनावणीसाठी हजर राहणे शक्य होणार नाही. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने ऑनलाईन सुनावणीचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी स्कॅन कोडही दिला आहे. या कोडवर स्कॅन केल्यास संबंधितांना त्वरित सुनावणीची तारीखही दिली जाते.

### ही आहेत सुनावणीची सात ठिकाणे..

०१) वाकड, थेरगाव, किवळे, कस्पटे वस्ती- वाकड विभागीय कार्यालय (नवीन कार्यालय इमारत), तेजस इंपेरीया, वाकड पोलीस चौकी शेजारी, भुजबळ चौक, वाकड.

०२) आकुर्डी, निगडी, चिंचवड- आकुर्डी विभागीय कार्यालय-पांडुरंग काळभोर सभागृह, पांढारकर नगर, आकुर्डीगाव.

०३) सांगवी, मनपा भवन, फुगेवाडी-
दापोडी- फुगेवाडी-दापोडी विभागीय कार्यालय मनपा दवाखाना इमारत, पहिला मजला, रेल्वे गेट जवळ, कासारवाडी.

०४) तळवडे, चिखली- तळवडे विभागीय कार्यालय-श्री. स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन, सेक्टर नं. 21, शिवभूमी विद्यालयाजवळ, यमुनानगर, निगडी.

०५) मोशी, भोसरी-मोशी विभागीय कार्यालय (नवीन कार्यालय इमारत) सन हार्मोनी, तळमजला गाळा क्र. 1 ते 4, शिवाजीवाडी, मोशी.

०६) दिघी, च-होली- दिघी विभागीय कार्यालय लोटस पॅराडाईज, पहिला मजला, दत्तनगर, दिघी.

०७) पिंपरी वाघेरे, पिंपरी नगर- जुने दुय्यम निबंधक कार्यालय इमारत कै. नंदकुमार जाधव उद्यान समोर, अशोक चित्रमंदिर जवळ, पिंपरी.

### 24 हजार मालमत्ता धारकांना बजावली विशेष नोटीस..

सर्वेक्षणात आढळलेल्या २४ हजार नवीन आणि वाढीव मालमत्ता धारकांना महापालिकेच्या वतीने प्रथम विशेष नोटीस बजावली आहे. या आठवड्यात ३० हजार तर ३१ जुलैपर्यंत ७५ हजार जणांना प्रथम विशेष नोटीस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# महाविकास आघाडीत 'बिघाडी'; खासदार कोल्हे यांचा जनता दरबार रद्द!

## भोसरीतील इच्छुक उमेदवार सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांची अस्वस्थता

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे व त्यांच्यासह २८ राष्ट्रवादीतील पदाधिकाऱ्यांनी आज शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याची संधी मिळावी, याकरिता अजित गव्हाणे यांनी हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जात आहे. अजित गव्हाणे हे भोसरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहे. त्यामुळेच त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला.**




विशेष म्हणजे, भोसरी विधानसभा मतदारसंघावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचाही दावा आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे पदाधिकारी, माजी नगरसेविका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट यांच्यासह भोसरीतील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी भोसरी विधानसभा मतदारसंघ आपल्या पक्षाला सुटावा, यासाठी प्रयत्न करत आहे. गव्हाणे यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेतील किंबहुना महाविकास आघाडीतील अस्वस्थता वाढली आहे.

दरम्यान, सुलभा उबाळे यांच्या पुढाकाराने शिरुर लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दि. १८ जुलै रोजी आयेजित केलेला जनता दरबार रद्द केला आहे. अजित गव्हाणे यांच्यामुळे महाविकास आघाडीतील निष्ठावंतांमध्ये असलेल्या नाराजीमुळे हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. तसेच, गव्हाणे यांचा प्रवेश पुण्यातील मोदीबाग येथे झाला.

### निष्ठावंत शिवसैनिक उद्या 'मातोश्री'वर धडकणार...!

भोसरी विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या माजी नगरसेविका सुलभा उबाळे निवडणूक लढविण्यास इच्छुक आहे भोसरी विधानसभा मतदारसंघात त्यांनी या अनुषंगाने आपले काम सुरू केले आहे. हा मतदारसंघ शिवसेना पक्षाला सुटावा यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु आज अजित गव्हाणे यांनी भोसरी विधानसभा मतदारसंघ लढविण्यासाठी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केल्याने भोसरी मधील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला. तसेच भोसरी विधानसभा मतदारसंघ हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला सुटावा, अशी मागणी करण्यासाठी हे सर्व पदाधिकारी उद्या मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन आपली मागणी करणार असल्याचे सांगितले जात आहे. आज या विषयावर चर्चा करण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना वतीने बैठक झाली. या बैठकीत अजित गव्हाणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने आपण सर्व नाराज झाल्याचे सांगितले आहे. तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघात खा. डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या विरोधात काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना आज शरद पवार यांनी पक्षात प्रवेश दिल्यानेही आपण नाराज असल्याचे या पदाधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांना सांगितले आहे.



भूमिका

**सतराव्या लोकसभेच्या अखेरच्या अधिवेशनात नवे गुन्हेगारी कायदे वा 'संहिता' घाईने मंजूर करून घेण्यात आल्या, तेव्हा राज्यसभेत या विषयावर प्रमुख वक्ता म्हणून मी तयार होतो; मात्र विरोधी बाकांवरील तब्बल १४६ सदस्यांना निलंबित केले गेल्याचा निषेध नोंदवणे महत्त्वाचे मानून मी माझे तयार भाषण संसदेत न करता एका इंग्रजी वृत्तपत्रास (२५ डिसेंबर २०२३ रोजीचा) लेख म्हणून दिले होते.**

# बदल घडवण्याची संधी गमावली...



पहिला मुद्दा असा की, अतिघाईने आणलेल्या या तीन संहितांमध्ये बऱ्याच सुधारणा कराव्या लागतील, संसदेत दुरुस्त्या मांडाव्या लागतील. टाळली गेलेली चर्चा त्यानिमित्ताने घडेल आणि याचा फायदाच आपल्या कायद्यांना होईल, पण अर्थात अशा सुधारणा आता मांडण्याइतका विनय आणि हिंमतसुद्धा सत्ताधाऱ्यांकडे हवी. हे गुण सत्ताधारी दाखवत नाहीत, तोवर हे दिवास्वप्नच राहणार.दुसरा मुद्दा म्हणजे- काहीतरी केल्यासारखे नुसते दाखवायचे, वरवरचे बदल करायचे आणि मूलभूत विचार करून संरचनात्मक बदल घडवण्याची तोशीस घ्यायचीच नाही हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी याआधी दाखवलेले अवगुण. त्यांचा दुष्प्रभाव तीन संहितांतही दिसून येतोच. तो कसा हे उदाहरणाने पाहू. 'भारतीय दंड विधाना'तील मूळच्या ५११ पैकी १७५ (३४.२४ टक्के) तरतुदीच भारतीय न्याय संहितेत थोड्याफार आणि त्याही वरवर बदलल्या गेल्या, त्यात २२ तरतुदी वगळल्या गेल्या आणि आठ तरतुदी नव्याने समाविष्ट झाल्या; दंड विधानाच्या दुसऱ्या प्रकरणात ४८ तरतुदींबाबतची जी स्पष्टीकरणे होती त्यांनाही फाटा देऊन भारतीय न्याय संहितेच्या पहिल्या प्रकरणातील अवघ्या तीन कलमांत सारी स्पष्टीकरणे कोंबण्यात आली; दंड विधानाचे प्रकरण १७ हे न्याय संहितेतही त्याच क्रमांकाचे असले तरी त्यात 'मालमत्ताविषयक गुन्हे'साठी जी मूळची ८४ कलमे होती ती खोडून फक्त ३१ कलमे आता उरली आहेत; हे सगळे या '१७५ बदलां'मध्ये मोजलेले आहे... पण 'भारतीय न्याय संहिते'त 'भादंवि'ऐवजी खरा नवा बदल म्हणाल तर तो फक्त आठच कलमांपुरता आहे. तिसरा मुद्दा 'वसाहतवादी कायदे आम्हीच बदलले' वगैरे दावे करून जणू क्रांतीच केल्याचा भास उत्पन्न करणाऱ्या राजकारणाचा फोलपणा उघड करणारा... ब्रिटिशांनी त्यांच्या सोयीसाठी आणलेली 'राजद्रोहा'ची तरतूद भारतीय दंड विधानात (कलम १२५) होती आणि तिला भारतीय न्याय संहितेच्या कलम १५२ मुळे तर अधिकच मोघम आणि सरकारधार्जिणे स्वरूप आल्याने नव्या संहितेने जणू लॉर्ड मेकॉलेला मुजराच केला आहे. एकंदर राजद्रोहाला देशद्रोहाचे स्वरूप आणून न थांबता, त्याची शिक्षाही नवी 'न्याय' संहिता तीनऐवजी सात वर्षे करते... तेसुद्धा, साक्षात सर्वोच्च न्यायालयापुढे भारताच्या महान्यायवादींनी (ॲटर्नी जनरल) मे २०२२ आणि पुन्हा ऑक्टोबर २०२२ मध्ये 'सरकार या कलमाचा साद्यांत फेरविचार करेल, तोवर याबाबतचे (राजद्रोह) सर्व खटले प्रलंबित ठेवू द्या' अशी विनंती केलेली असताना. म्हणजे सरकारने केवळ न्यायतत्त्वांचा नव्हे तर सर्वोच्च न्यायालयाचाही आब राखलेला नाही आणि याचा मोठा फटका तळागाळातील कार्यकर्त्यांपासून ते सत्तेला सत्याचा आरसा दाखवणाऱ्या सर्वांनाच बसणार आहे. चौथा मुद्दा 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' या फौजदारी कायद्याऐवजी (क्रिमिनल प्रोसिजर कोड- सीआरपीसी) आणलेल्या संहितेतील कलम १८७ साठी केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाबद्दल. '६० ते ९० दिवस (पोलीस) कोठडी'च्या मुदतीची ही तरतूद 'सलग इतके दिवस नव्हे, तर आरोपीला न्यायालयापुढे सादर केल्यानंतरच्या ४० ते ६० दिवसांत कधीही (आरोपपत्र दाखल करण्याची मुदत ६० दिवस आहे की ९० यावर अवलंबून) टप्प्याटप्प्याने, पण जास्तीत जास्त १५ दिवसांचीच पोलीस कोठडी' अशी असल्याचे गृहमंत्री म्हणतात. पण यातून आरोपीच्या छळाच्या शक्यता प्रचंड वाढतात... संशयित आरोपीला पोलीस एका आठवड्यात तीन दिवस, दुसऱ्या आठवड्यात पुन्हा दोन दिवस अशा प्रकारे कोठडीत ठेवू शकतात, त्यातून प्रत्यक्ष आणि संभाव्य छळ अधिक करता येईल. मुळात एखाद्याला संशयावरून अटक होते तीच जर 'संशयाला भक्कम पुष्टी देणारे पुरावे हाती आल्यानंतर', तर मग वारंवार कोठडीत घेतले जाण्याच्या टांगत्या तलवारीची व त्यातून येणाऱ्या अशाश्वतीची गरजच काय?

## प्रासंगिक »

### 'रिटर्न गिफ्ट'!

***केंद्रात जोरदार वकिली करेल असे नेतृत्व नसल्याने, अन्य राज्यांच्या मागण्या त्वरेने मान्य होत असताना मुंबई आणि महाराष्ट्रास बराच काळ प्रतीक्षा सहन करावी लागते...***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी मुंबईत बोलताना महाराष्ट्र कसा आर्थिक विकासाचे केंद्र आहे आणि या संदर्भात तो अधिक व्यापक कामगिरी कशी करू शकतो यावर आशादायी भाष्य केले. त्याचे स्वागत. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी आरूढ झाल्यानंतर मोदींची ही पहिलीच मुंबई भेट. अंबानींच्या शेंडेफळाचे दोनाचे चार होत असताना उभयतांस आशीर्वाद देण्याच्या मिषाने पंतप्रधान मुंबईत हजर होते. खाशा पाहुण्यांतील त्यांच्या सहभागाचा लाभ महाराष्ट्र सरकारने घेतला आणि थोरल्याच्या लग्नात धाकट्याची मुंज उरकून टाकावी तसे काही प्रकल्पांचे भूमिपूजन इत्यादी पंतप्रधानांच्यासंगणक वा मोबाइलच्या माध्यमातून अधिकाधिक आर्थिक व्यवहार करवण्याच्या नव्या तंत्रास अलीकडे चांगलीच मागणी आहे. पेटीएम, मोबिक्विक, गूगल पे, फोन पे आदी या विस्तारत्या क्षेत्राची उदाहरणे.

शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वाढत असताना काही वर्षांपूर्वी एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये शहराला भेडसाविणारी प्रमुख समस्या कोणती, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सहाजिकच वाहतूक कोंडी आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक सुविधेचा अभाव, असेच उत्तर पुढे आले.

# पीएमपी, बीआरटीची रडकथा...



अलीकडच्या पाच ते दहा वर्षांत पीएमपी सक्षमीकरणासंदर्भात सातत्याने चर्चा झाली आणि होत आहे. प्रत्यक्षात पीएमपीचे सक्षमीकरण कागदावरच राहिले आहे. पीएमपीमधील अधिकारी आणि राज्यकर्त्यांमध्ये पीएमपी 'आपली' आहे, ही मानसिकता निर्माण होत नाही तोपर्यंत पीएमपीची रडकथा कायम राहणार आहे.कोणत्याही शहरातील सार्वजनिक वाहतूक यंत्रणा नेहमी तोट्यात असते, हे वास्तव आहे. शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी आणि पुणे तसेच पिंपरी-चिंचवडमधील बारा लाखांपेक्षा जास्त प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी सतरा वर्षांपूर्वी या दोन्ही महापालिकेतील परिवहन उपक्रमांचे एकत्रीकरण करून पीएमपी ही स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आली. मेट्रो, पीएमपी, उच्च क्षमता वर्तुळाकार मार्ग, बीआरटी हे सार्वजनिक वाहतुकीचे प्रमुख घटक आहेत. मात्र गाड्या खरेदीतील दफ्तर दिरंगाई, निविदा प्रक्रियेतील अनियमितता आणि गैरव्यवहार, थांब्यांची दुरवस्था, अरेरावीपणा आणि अनास्था अशा अनेक गोष्टी पीएमपीच्या रडकथेला हातभार लावत आहेत. पीएमपीच्या सुधारणेचा विषय निघाला की, आर्थिक तुटीचे कारण आपसूक पुढे येते. तो तोटाही महापालिकांकडून भरून काढला जातो. पण कामगिरीत सुधारणाच दिसत नाही.हीच अवस्था बीआरटीची. देशातील पहिला बीआरटी मार्ग प्रायोगिक तत्त्वावर पुण्यात सुरू करण्यात आला. पण बीआरटी मार्ग कुठे आहे, असा प्रश्न विचारण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. बीआरटी मार्गात सुधारणेच्या नावाखाली असंख्य बदल आणि प्रयोग करण्यात आले. पण ते उपयुक्त ठरलेच नाहीत. उलट, बीआरटी मार्गांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे कारण देत बीआरटी मार्गावरच हातोडा टाकण्याचे काम महापालिका प्रशासन, माजी नगरसेवक आणि पीएमपीच्या अधिकाऱ्यांनी मिळून केले आहे. त्यामुळे बीआरटी सध्या मृत्युशय्येवर आहे.सार्वजनिक वाहतूक सुविधांच्या सक्षमीकरणाच्या निव्वळ गप्पा किंवा कागदोपत्री आराखडे करून चालणार नाही, त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल, याकडे कोणीही लक्ष देत नाही. त्यामुळे बैठका, प्रस्ताव यातच सुधारणा अडकली आहे. मेट्रो, बीआरटी, पीएमपी या आणि अन्य सार्वजनिक वाहतूक सेवांची सांगड मेट्रोबरोबर घालावी लागणार आहे, तरच शाश्वत वाहतूक व्यवस्था शहरात निर्माण होईल. प्रवाशांना पायाभूत सुविधा देणे, खासगी आणि सार्वनजिक वाहतूक सेवांमध्ये समन्वय साधल्यास पुण्यातील प्रवास सुखकर होणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एकनाथ शिंदेंसाठी कंगना रणौत मैदानात!

## » राजकारणी काय गोलगप्पे (पाणीपुरी) विकणार का?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बद्रीनाथ ज्योतिर्मठ पीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी सोमवारी (१५ जुलै) शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी जाऊन भेट दिली. यावेळी संपूर्ण ठाकरे कुटुंबीय, उबाठा गटाचे नेते, पदाधिकारी अविमुक्तेश्वरानंद यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मातोश्रीवर उपस्थित होते.**



याभेटीनंतर स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांचं कौतुक केलं तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका देखील केली. अविमुक्तेश्वरानंद यांनी उद्धव ठाकरेंबरोबर सर्वात मोठा विश्वासघात झाल्याचं सांगत राज्यातील सत्तासंघर्षावर दुःख व्यक्त केलं. तसेच यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे लवकरच पुन्हा एकदा मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छाही यावेळी व्यक्त केली. दरम्यान, अविमुक्तेश्वरानंद यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्यानंतर बॉलिवूड अभिनेत्री व भाजपा खासदार कंगना रणौत या मुख्यमंत्री शिंदेंसाठी मैदानात उतरल्या आहेत. कंगना रणौत यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की राजकारणात, युती, आघाडी, पक्ष व नेत्यांमधील करार आणि एखाद्या पक्षाचं विभाजन होणं अत्यंत सामान्य तसेच संवैधानिक (घटनात्मक) बाब आहे. १९०७ साली, १९७१ साली कॉंग्रेस पक्षाचं विभाजन झालं होतं. राजकारणी लोक राजकारणात राजकारण करणार नाहीत तर मग काय गोलगप्पे (पाणीपुरी) विकणार का?कंगना रणौत म्हणाल्या, शंकराचार्यांनी त्यांच्या शब्दांचा, प्रभावाचा आणि धार्मिक शिक्षणाचा गैरवापर केला आहे. धर्म असं सांगतो की, राजाच जर प्रजेचं शोषण करू लागला तर देशद्रोह हा शेवटचा धर्म आहे. शंकराचार्यांनी महाराष्ट्राचे आमचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान केला आहे. त्यांनी अपमानजनक शब्दांचा वापर करून मुख्यमंत्र्यांवर देशद्रोही, गद्दार व विश्वासघातकी असल्याचा आरोप करत सर्वांचा भावना दुखावल्या आहेत. शंकराचार्य अशा छोट्या आणि क्षुल्लक गोष्टी सांगून हिंदू धर्माची प्रतिष्ठा धुळीस मिळवत आहेत.शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी मातोश्रीवर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला तेव्हा ते म्हणाले होते कोणाचं हिंदुत्व खरं आणि कोणाचं खोटं हे जाणून घ्यावं लागेल. विश्वासघात करणारा हिंदू असू शकत नाही. जो सहनशील आहे, विश्वासघातही सहन करतो तेच खरा हिंदू असणार. ज्यांनी विश्वासघात केला ते हिंदू असू शकत नाहीत. उद्धव ठाकरेंबरोबर विश्वासघात झाला, ही बाब लोकसभा निवडणुकीच्या निकालातूनही स्पष्ट झाली आहे. महाराष्ट्राच्या जनतेनेही मतपेटीचया माध्यमातून तोच संदेश दिला आहे.या भेटीनंतर स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांचं कौतुक केलं तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका देखील केली. अविमुक्तेश्वरानंद यांनी उद्धव ठाकरेंबरोबर सर्वात मोठा विश्वासघात झाल्याचं सांगत राज्यातील सत्तासंघर्षावर दुःख व्यक्त केलं. तसेच यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे लवकरच पुन्हा एकदा मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छाही यावेळी व्यक्त केली. दरम्यान, अविमुक्तेश्वरानंद यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्यानंतर बॉलिवूड अभिनेत्री व भाजपा खासदार कंगना रणौत या मुख्यमंत्री शिंदेंसाठी मैदानात उतरल्या आहेत. कंगना रणौत यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की राजकारणात, युती, आघाडी, पक्ष व नेत्यांमधील करार आणि एखाद्या पक्षाचं विभाजन होणं अत्यंत सामान्य तसेच संवैधानिक (घटनात्मक) बाब आहे. १९०७ साली, १९७१ साली कॉंग्रेस पक्षाचं विभाजन झालं होतं. राजकारणी लोक राजकारणात राजकारण करणार नाहीत तर मग काय गोलगप्पे (पाणीपुरी) विकणार का?कंगना रणौत म्हणाल्या

### कोणाचं हिंदुत्व खरं कोणाचं खोटं

राजाच जर प्रजेचं शोषण करू लागला तर देशद्रोह हा शेवटचा धर्म आहे. शंकराचार्यांनी महाराष्ट्राचे आमचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान केला आहे. त्यांनी अपमानजनक शब्दांचा वापर करून मुख्यमंत्र्यांवर देशद्रोही, गद्दार व विश्वासघातकी असल्याचा आरोप करत सर्वांचा भावना दुखावल्या आहेत. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी मातोश्रीवर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला तेव्हा ते म्हणाले होते कोणाचं हिंदुत्व खरं आणि कोणाचं खोटं हे जाणून घ्यावं लागेल.


# बारामतीच्या भाषणात माझं प्रचंड कौतुक

## » शांतता प्रस्थापित करण्यासाठी शरद पवारांची गरज : छगन भुजबळ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापलं आहे. मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. तर मनोज जरांगे यांनी केलेल्या मागणीला ओबीसींचा विरोध आहे. तसेच ओबीसी आणि मराठा नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.**

दरम्यान, यावर तोडगा काढण्यासाठी काही दिवसांपूर्वी सर्वपक्षीय बैठक पार पडली. मात्र, या बैठकीला विरोधी पक्षाचे नेते गैरहजर राहिले. त्यामुळे यासंदर्भात काहीही ठोस निर्णय झाला नाही. यानंतर मंत्री छगन भुजबळ यांनी सिल्व्हर ओक या शरद पवारांच्या निवासस्थानी जात त्यांची भेट घेतली.या भेटीत मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणासंदर्भात चर्चा झाल्याचं भुजबळांनी सांगितलं. आता भुजबळांच्या भेटीबाबत शरद पवारांनी भाष्य केलं आहे. “छगन भुजबळांचं बारामतीमधील भाषणं चांगलं झालं, त्यांनी माझ्याबद्दल प्रचंड कौतुक व्यक्त केलं. तसेच शांतता प्रस्थापित करण्यासाठी शरद पवारांची गरज आहे, असं मार्गदर्शन





मला त्यांनी भेटीदरम्यान केलं”, असं म्हणत शरद पवारांनी भुजबळांना खोचक टोला लगावला. ते आज पुण्यात पत्रकार परिषदेत ते बोलत होते.छगन भुजबळ यांची हल्ली दोन-तीन भाषणं फार चांगली झाली. मला भेटण्याच्या आधी एक दिवस ते बारामतीला गेले होते आणि बऱ्याच गोष्टी ते बोलले. त्याआधी ते बीडला गेले होते. तिथेही छगन भुजबळांनी चांगल्या प्रकारचं भाषण केलं. बीड आणि बारामती येथील दोन्हीही भाषणामध्ये त्यांनी माझ्याबद्दल प्रचंड आस्था व्यक्त केली आणि कौतुक व्यक्त केलं”, असा खोचक टोला शरद पवार यांनी लगावला.

शरद पवार पुढे म्हणाले, “बारामतीमधील त्यांच्या भाषणानंतर दुसऱ्या दिवशी ते मला भेटायला आले. मला थोडं बर वाटत नव्हतं. थोडा ताप होता म्हणून मी दोन दिवस सुट्टी काढली होती. मला झोपेतून उठवलं आणि सांगितलं की छगन भुजबळ आले आहेत. मी विचारलं की कधी आलेत, तर मला सांगण्यात आलं की एक तास झाला. मी म्हटलं एक तास? मग मला सांगितलं की ते बोलले की भेटल्याशिवाय जायचंच नाही.

### भुजबळ काय म्हणाले होते?

त्यानंतर छगन भुजबळ आले आणि मला त्यांनी काही गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले की या-या गोष्टी केल्या पाहिजेत. तरच महाराष्ट्राचं हित आहे. आता शांतता प्रस्थापित करण्यासाठी शरद पवारांची गरज आहे, असं मार्गदर्शन मला छगन भुजबळांनी केलं. ही गोष्ट नाकारता येत नाही”, असा मिश्किल टोला शरद पवार यांनी छगन भुजबळांना लगावला.राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचा बारामतीत काही दिवसांपूर्वी मेळावा पार पडला होता. या मेळाव्यात बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी शरद पवार यांच्यावर हल्लाबोल केला होता

# भोले बाबांकडून असंवेदनशीलतेचा कळस!

## आमच्याविरोधात कट रचला : सूरज पाल सिंह जाटव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हाथरस येथे स्वयंघोषित धर्मगुरू नारायण साकार उर्फ भोले बाबा उर्फ सूरज पाल सिंह जाटव यांच्या सत्संगाच्या कार्यक्रमात झालेल्या चेंगराचेंगरीत १२३ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर देशभरातून आयोजक आणि भोले बाबांविरोधात संतापाची लाट उसळली असतानाच नारायण साकार यांनी एक असंवेदनशील वक्तव्य केलं आहे. नारायण साकार म्हणाले, “ही दुर्घटना घडल्यापासून मी खूप चिंतेत आहे. परंतु, जे घडणार आहे, ते कसं टाळता येईल. ज्याने या जगात, या भूमीवर जन्म घेतलाय त्याला एक दिवस जायचंच आहे. भले त्याच्या मागे कोणी असो अथवा नसो. प्रत्येकाला परत फिरायचं आहे.”**




### चेंगराचेंगरीत 123 जणांचा मृत्यू

दुर्घटनेनंतर दोन दिवसांनी त्यांनी एक निवेदन जारी केलं होतं. या निवेदनाद्वारे त्यांनी चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडलेल्या त्याच्या अनुयायांना मदत करणार असल्याची घोषणा केली होती. दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या कुटुंबियांची जबाबदारी मी घेईन असंही नारायण साकार यांनी म्हटलं होतं. मात्र या दुर्घटनेत ज्यांनी आपल्या कुटुंबियांना गमावलं आहे त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितलं की “आतापर्यंत आम्हाला कोणीही भेटलेलं नाही. भोले बाबा किंवा त्यांच्या आश्रमातील कोणीही आमच्याशी संपर्क साधलेला नाही, नारायण साकार उर्फ भोले बाबा उर्फ सूरज पाल सिंह जाटव यांच्या सत्संगाच्या कार्यक्रमात झालेल्या चेंगराचेंगरीत १२३ जणांचा मृत्यू झाला आहे.

नारायण साकार यांनी त्यांचे वकील एस. पी. सिंह यांचा विषारी वायूसंदर्भातील दावा खरा असल्याचं म्हटलं आहे. सिंह यांनी दावा केला होता की “सत्संगाच्या कार्यक्रमात कोणीतरी विषारी पदार्थ अथवा वायू फवारला होता. त्यामुळेच ही चेंगराचेंगरी झाली आणि अनेक भक्त मृत्यूमुखी पडले.” नारायण साकार या दाव्याला दुजोरा देत म्हणाले, “सत्संगात कोणीतरी विषारी वायू फवारल्याची बाब खरी आहे. कोणीतरी आमच्याविरोधात कट रचला आहे. काहीजण आम्हाला बदनाम करू पाहत आहेत. परंतु, माझा या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीवर पूर्ण विश्वास आहे.”हाथरसमध्ये चेंगराचेंगरीची घटना झाल्यापासून नारायण साकार फरार होते, जे आता एका कार्यक्रमाच्या निमित्ताने माध्यमांसमोर आले आहेत. नारायण साकार म्हणाले, “प्रत्यक्षदर्शींनी आम्हाला दिलेल्या माहितीनुसार सत्संगाच्या कार्यक्रमात विषारी वायूची फवारणी झाल्याचं वृत्त खरं आहे. यामागे मोठं षडयंत्र आहे. काहीजण माझी बदनामी करू पाहतायत. मात्र या प्रकरणाचा तपास करणारं एसआयटीचं पथक सत्य जगासमोर मांडेल.”हाथरसमधील चेंगराचेंगरीच्या घटनेचा तपास करणारं एसआयटीचं पथक अद्याप नारायण साकार यांची चौकशी करू शकलेलं नाही. कारण दुर्घटना झाल्यापासून ते फरार होते. दुर्घटनेनंतर दोन दिवसांनी त्यांनी एक निवेदन जारी केलं होतं. या निवेदनाद्वारे त्यांनी चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडलेल्या त्याच्या अनुयायांना मदत करणार असल्याची घोषणा केली होती. दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या कुटुंबियांची जबाबदारी मी घेईन असंही नारायण साकार यांनी म्हटलं होतं. मात्र या दुर्घटनेत ज्यांनी आपल्या कुटुंबियांना गमावलं आहे त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितलं की “आतापर्यंत आम्हाला कोणीही भेटलेलं नाही. भोले बाबा किंवा त्यांच्या आश्रमातील कोणीही आमच्याशी संपर्क साधलेला नाही, तसेच आम्हाला कुठल्याही प्रकारची मदत मिळालेली नाही.”

नारायण साकार यांनी त्यांचे वकील एस. पी. सिंह यांचा विषारी वायूसंदर्भातील दावा खरा असल्याचं म्हटलं आहे. सिंह यांनी दावा केला होता की “सत्संगाच्या कार्यक्रमात कोणीतरी विषारी पदार्थ अथवा वायू फवारला होता. त्यामुळेच ही चेंगराचेंगरी झाली आणि अनेक भक्त मृत्यूमुखी पडले.” नारायण साकार या दाव्याला दुजोरा देत म्हणाले, “सत्संगात कोणीतरी विषारी वायू फवारल्याची बाब खरी आहे. कोणीतरी आमच्याविरोधात कट रचला आहे. काहीजण आम्हाला बदनाम करू पाहत आहेत. परंतु, माझा या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीवर पूर्ण विश्वास आहे.”हाथरसमध्ये चेंगराचेंगरीची घटना झाल्यापासून नारायण साकार फरार होते, जे आता एका कार्यक्रमाच्या निमित्ताने माध्यमांसमोर आले आहेत. नारायण साकार म्हणाले, “प्रत्यक्षदर्शींनी आम्हाला दिलेल्या माहितीनुसार सत्संगाच्या कार्यक्रमात विषारी वायूची फवारणी झाल्याचं वृत्त खरं आहे. यामागे मोठं षडयंत्र आहे. काहीजण माझी बदनामी करू पाहतायत. मात्र या प्रकरणाचा तपास करणारं एसआयटीचं पथक सत्य जगासमोर मांडेल.”हाथरसमधील चेंगराचेंगरीच्या घटनेचा तपास करणारं एसआयटीचं पथक अद्याप नारायण साकार यांची चौकशी करू शकलेलं नाही. कारण दुर्घटना झाल्यापासून ते फरार होते.

# अग्निवीरांसाठी नोकरीत १० टक्के आरक्षण

## 25 टक्के अग्निवीरांना पद्धतीने स्थायी सेवेत स्थान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी अग्निवीरांसाठी मोठी घोषणा केली आहे. सैनी म्हणाले, अग्निवीरांना शासकीय नोकरीत १० टक्के आरक्षण मिळेल. आमचं सरकार हरियाणामधील अग्निवीरांना राज्य सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या विशिष्ट नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची घोषित करत आहे.**



### 5 लाख रुपयांचं बिनव्याजी कर्ज

सीआएसएफ, बीएसएफ, सीआरपीएफ व एसएसबीच्या प्रमुखांनी अग्निवीरांसाठी आरक्षणाची घोषणा केली होती. माजी अग्निवीरांना निमलष्करी दलांमध्ये १० टक्के आरक्षणाची घोषणा करण्यात आली आहे. तसेच वयोमर्यादा व शारीरिक चाचणीतही सुट दिली जाणार आहे. सीआयएसएफच्या महासंचालिका नीना सिंह यांनी म्हटलं होतं की पहिल्या तुकडीतील अग्निवीर निवृत्त झाल्यानंतर त्यांना वयोमर्यादेत पाच वर्षांची तर त्यानंतरच्या तुकड्यांमधील अग्निवीरांना निमलष्करी दलांच्या वयोमर्यादित तीन वर्षांची सूट दिली जाईल.

याअंतर्गत पोलीस हवालदार, मायनिंग गार्ड, फॉरेस्ट गार्ड, जेल वॉर्डन व एसपीओ पदांसाठी अग्निवीरांची थेट भरती केली जाईल. अग्निवीरांना गट क आणि गट ड मधील सरकारी पदांसाठी विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत तीन वर्षांची सूट दिली जाईल. परंतु, अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीला पाच वर्षांची सवलत दिली जाईल.गट क मधील नागरी विभागातील नोकऱ्यांमधील भरतीत अग्निवीरांसाठी पाच टक्के आरक्षण, गट ड मध्ये एक टक्का आरक्षण दिलं जाणार आहे. जे कारखाने अथवा उद्योग अग्निवीराला दरमहा ३० हजार रुपये किंवा त्याहून अधिक पगार देतील त्या कारखान्यांना, उद्योगांना हरियाणा सरकार वार्षिक ६० हजार रुपये अनुदान देईल, अशी माहिती मुख्यमंत्री सैनी यांनी दिली आहे.मुख्यमंत्री नायब सिंह सैनी म्हणाले, गट क मधील भरती करताना अग्निवीरांसाठी ५ टक्के जागा राखीव असतील. तसेच जे अग्निवीर चार वर्षांच्या सेवेनंतर परततील, त्यांना जर स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर सरकार त्यांना ५ लाख रुपयांचं बिनव्याजी कर्ज देईल.

# प्रियांका चोप्रा-निक जोनासला सोडावं लागलं लॉसमधील घर

अभिनेत्री प्रियांका चोप्रा पती निक जोनास आणि मुलीसह लॉस एंजेलिसमध्ये राहते. पण तिला तिचं आलिशान घर सोडावं लागलं आहे. हे घर आता राहण्यायोग्य नाही. घरात पाणी गळतीमुळे बुरशी लागली आहे. बुरशी आरोग्यासाठी हानिकारक आहे, त्यामुळे घराची दुरुस्ती होईपर्यंत त्यांनी हे घर सोडलं आहे. हे जोडपं आता घराच्या जुन्या मालकाविरोधात कायदेशीर लढाई लढत असल्याचं म्हटलं जात आहे. पेज सिक्सच्या वृत्तानुसार, घरात ज्या काही समस्या आहेत, त्या आरोग्याच्या दृष्टिने चांगल्या नाहीत. प्रियांका आणि निक यांनी पाच वर्षांपूर्वी २०१९ मध्ये हे आलिशान घर २० मिलियन डॉलर्समध्ये खरेदी केले होते. या घरामध्ये सात बेडरूम, नऊ बाथरूम, टेम्प्रेचर कंट्रोल वाइन सेलर, किचन, होम थिएटर, बॉलिंग ॲली, स्पा आणि स्टीम शॉवर, जिम आणि एक बिलियर्ड्स रूम आहे.मे २०२३ मध्ये प्रियांका व निकने कायदेशीर खटला दाखल केलाय, असं म्हटलं जात आहे. अहवालानुसार, घर खरेदी केल्यानंतर काही दिवसांतच पूल आणि



स्पामध्ये समस्या दिसू लागल्या होत्या. वॉटरप्रूफिंग नसल्यामुळे घराच्या अनेक भागात बुरशी वाढू लागली, तसंच बारबेक्यूमध्येही पाणी गळत होतं, असं तक्रारीत म्हटलं आहे.प्रियांका चोप्रा आणि निक जोनास यांना त्यांच्या नुकसान भरपाई हवी आहे. या घराच्या दुरुस्तीसाठी जोनास दाम्पत्याने केलेला खर्च त्यांना घराच्या जुन्या मालकाकडून पाहिजे आहे. घराच्या दुरुस्तीत आतापर्यंत १५ मिलियन डॉलर्सहून अधिक खर्च झाला आहे. या घराची दुरुस्ती होईपर्यंत प्रियांका व निक आपल्या मुलीसह दुसरीकडे राहतील.अभिनेत्री प्रियांका चोप्रा पती निक जोनास आणि मुलीसह लॉस एंजेलिसमध्ये राहते. पण तिला तिचं आलिशान घर सोडावं लागलं आहे. हे घर आता राहण्यायोग्य नाही. घरात पाणी गळतीमुळे बुरशी लागली आहे. बुरशी आरोग्यासाठी हानिकारक आहे, त्यामुळे घराची दुरुस्ती होईपर्यंत त्यांनी हे घर सोडलं आहे. हे जोडपं आता घराच्या जुन्या मालकाविरोधात कायदेशीर लढाई लढत असल्याचं म्हटलं जात आहे. पेज सिक्सच्या वृत्तानुसार, घरात ज्या काही समस्या आहेत, त्या आरोग्याच्या दृष्टिने चांगल्या नाहीत.

## शिल्पाचा 'या' पुरस्काराने गौरव

अभिनेत्री शिल्पा शेट्टी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तीन दशकांहून अधिक काळापासून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी शिल्पा उत्तम डान्सरही आहे. छोट्या पडद्यावरील अनेक रिॲलिटी शोची परीक्षक म्हणून ती काम करते. अभिनयाबरोबरच ती तिच्या फिटनेससाठी खूप लोकप्रिय आहे. नुकतीच ती रोहित शेट्टीच्या 'इंडियन पोलीस फोर्स' या वेब सिरीजमध्ये झळकली. आता शिल्पाला एक पुरस्कार मिळाला आहे, तिनेच पोस्ट करून याबाबत माहिती दिली आहे. 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' हा पुरस्कार समाज सेवा, सामाजिक विकास, शिक्षण, नवनवीन उपक्रम, क्रीडा आणि संस्कृती या क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जातो. कला क्षेत्रातील योगदानासाठी 'चॅम्पियन्स ऑफ चेंज २०२३' हा पुरस्कार शिल्पा शेट्टी कुंद्राला देण्यात आला आहे.शिल्पा शेट्टीला गौरविण्यासाठी व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आलं, तेव्हा सूत्रसंचालकाने तिच्या कला क्षेत्रातील कामगिरी सांगितली. "शिल्पा शेट्टी कुंद्रा तुम्ही एक प्रतिष्ठीत भारतीय अभिनेत्री आणि योग विद्येत पारंगत आहात. कला आणि कलाकाराला कोणतेही वय आणि सीमा नसते.

## सलमानसोबत दिसणार 'त्रिशा'!



साऊथमधील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून त्रिशाची ओळख आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असणाऱ्या त्रिशाचा आणि थलपती विजयचा लिओ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यालाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता मिळालेल्या माहितीनुसार, त्रिशा ही तब्बल तेरा वर्षांच्या ब्रेकनंतर बॉलीवूडमध्ये इंट्री करणार असल्याची माहिती आहे. साऊथमधील सर्वाधिक पॉप्युलर आणि मानधन घेणारी अभिनेत्री म्हणूनही त्रिशाचे नाव घेतले जाते. काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या प्रकरणामुळे ती चर्चेत आली होती. तिच्या सहकारी कलाकारानं मन्सूर अली खाननं तिच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यामुळे त्रिशानं थेट कोर्टात धाव घेतली होती. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे. १३ वर्षांच्या अंतरानं त्रिशा बॉलीवूडमध्ये चमकणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, त्रिशा ही विष्णु वर्धन यांची पुढील फिल्म ती मुख्य भूमिकेत दिसणार आहे. त्या चित्रपटामध्ये ती चक्क सलमान खानसोबत दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. अजुन या चित्रपटाची अधिकृतपणे घोषणा झालेली नाही. मात्र ती लवकरच होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्रिशाच्या भूमिकेविषयी सांगायचे झाल्यास तिच्या गेल्या काही चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यात लिओचा मोठा वाटा आहे. तिच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवरही मोठी कमाई केली होती. २०१० मध्ये त्रिशानं अक्षय कुमारच्या खट्टा मिठा मध्ये काम केले होते. एका राजकीय विषयावर आधारित हा चित्रपट होता. त्यातील तिच्या भूमिकेचे कौतुकही झाले होते. सध्या त्रिशाच्या आगामी प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ती विदामुयार्ची नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसणार आहे. मल्याळम चित्रपट आयडेंटीटी नावाच्या चित्रपटातही तिची महत्वाची भूमिका आहे. त्यानंतर ती मणिरत्नम यांच्या ठग लाईफ नावाच्या चित्रपटामध्ये झळकणार आहे. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे.

## प्रियांकाची 'ही' बहीण चढणार बोहल्यावर!

देसी गर्ल प्रियांका चोप्रा हिच्या बहिणींची नेहमी चर्चा रंगलेली असते. सध्या 'बिग बॉस १७'मुळे मनारा चोप्रा चर्चेत आहे. तसंच दुसऱ्या बाजूला परिणीती चोप्राने संगीत क्षेत्रात पदार्पण केल्यामुळे चर्चा रंगली आहे. अशातच आता प्रियांकाची आणखी बहीण चर्चेत आली आहे. कारण आहे तिच लग्न. २४ सप्टेंबर २०२३ रोजी अभिनेत्री परिणीती चोप्रा मिसेज चड्डा झाली. तिने आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्डा यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. आता पुन्हा चोप्रा कुटुंबात सनई-चौघडे वाजणार आहेत. प्रियांका, परिणीतीची बहीण मीरा चोप्रा मार्चमध्ये लग्न करणार असल्याचं समोर आलं आहे. याचा खुलासा तिने स्वतः केला आहे.इस्टंट बॉलीवूड' या एंटरटेनमेंट चॅनलशी बोलताना मीरा म्हणाली, "मी लग्न करणार आहे. सध्या लग्नाची तयारी सुरु आहे. मार्चमध्ये लग्न आहे. लग्नाचं ठिकाण ठरलं आहे. राजस्थानमध्ये पारंपरिक पद्धतीने लग्न होणार आहे." त्यानंतर होणाऱ्या नवऱ्याबाबत विचारलं असता मीराने ते गुलदस्त्यात ठेवलं. पुढे मीराने म्हणाली, "लग्नासाठी प्रियांका व निक जोनस यांना आमंत्रण दिलं जाईल. जर ते कोणत्या प्रोजेक्टमध्ये व्यस्त नसतील तर ते नक्की येतील."दरम्यान, मीराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'सेक्शन ३७५', 'सफेद' यांसारख्या चित्रपटात तिने काम केलं आहे. मीराने दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. ती 'मरुधामलाई', 'अन्बे आरुयीरे' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.



## रश्मिका मंदानाचं विजय देवरकोंडाबद्दल विधान

लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि साऊथ स्टार विजय देवरकोंडा यांच्या नात्याची खूप चर्चा होत असते. दोघेही एकमेकांसह डेटिंग करत असल्याच्या आणि रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा आहेत. पण त्यांनी मात्र याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही. नुकतंच रश्मिकाला तिच्या आणि विजयच्या बॉन्डबद्दल विचारण्यात आलं तेव्हा ती त्याच्याबद्दल भरभरून बोलली. विजय तिच्या आयुष्यातला खूप मोठा आधार आहे, असंही ती म्हणाली.एका मुलाखतीत रश्मिकाला तिच्या सहकलाकारांबरोबर असलेल्या नात्याबद्दल विचारण्यात आलं. ज्यात अमिताभ बच्चन (गुडबाय), रणबीर कपूर (ॲनिमल), विजय देवरकोंडा (गीता गोविंदम, डिअर कॉम्रेड), सिद्धार्थ मल्होत्रा (मिशन मजनू) आणि अल्लू अर्जून (पुष्पा) यांच्या नावांचा समावेश होता. त्यावर रश्मिका म्हणाली, "विजू आणि मी एकत्र मोठे झालो आहोत, त्यामुळे मी माझ्या आयुष्यात जे काही करते, त्यात त्यांची योगदान असतं. मी त्याचा प्रत्येक गोष्टीत सल्ला घेते. मला नेहमी त्यांचं मत जाणून घ्यायचं असतं आणि तो प्रत्येक गोष्टीत मी म्हणेन ते बरोबर असं म्हणणारा नाही."पुढे रश्मिका म्हणाली, "विजय स्पष्ट बोलतो. 'हे चांगल आहे', 'हे वाईट आहे', 'मला याबद्दल असं वाटतं' असं तो सरळ सांगतो. माझ्या आयुष्यात कोणीही मला इतका पाठिंबा दिला नसेल, जितका विजयने दिला आहे.

# ऑलिम्पिकची उत्सुकता भारतातही!

## » जिओ सिनेमावर पाहता येणार लाईव्ह सामने!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक २०२४ ला येत्या २६ जुलैपासून सुरूवात होणार आहे. जगभरातील अनेक उत्कृष्ट खेळाडू या मोठ्या स्पर्धेत जास्तीत जास्त पदक मिळवण्यासाठी प्रयत्न करतील. भारतीय खेळाडूंनी गेल्या काही वर्षात या सर्वात मोठ्या स्पर्धेत ज्या प्रकारची कामगिरी केली आहे, ते पाहता यंदाही खेळाडू अधिकाधिक पदके मिळवतील अशी भारतीय चाहत्यांना आशा आहे. दरम्यान, भारतातील चाहत्यांना ऑलिम्पिकचे पॅरिसमध्ये हे सामने लाइव्ह कसे पाहता येणार, असा प्रश्न पडला आहे.**



फ्रान्समधील पॅरिस या जगप्रसिद्ध शहरात २६ जुलै ते ११ ऑगस्ट या कालावधीत ऑलिम्पिक २०२४ चे सामने रंगणार आहेत. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये एकूण २०६ देश सहभागी होणार आहेत. भारतीय खेळाडू यंदाही नवे विक्रम रचून जास्तीत जास्त पदके जिंकण्याचा प्रयत्न करतील. भारताच्या इतिहासात सध्या एकूण ३५ ऑलिम्पिक पदके आहेत. २००८ मध्ये बीजिंगमध्ये अभिनव बिंद्राने देशातील पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले होते. नुकतेच नीरज चोप्राने भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून सुवर्णपदकांचा दुष्काळ संपवला होता. २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये त्याने ही कामगिरी केली. ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय ॲथलिट ठरला. यंदा भारताकडे खेळाडूंचा ताफा आहे. ऑलिम्पिक सुवर्णविजेता नीरज चोप्रा, शटलर पीव्ही सिंधू, सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पुरुष जोडी आणि पुरुष हॉकी संघाला पॅरिसमध्ये पदक जिंकण्याची सुवर्ण संधी आहे.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ भारतात स्पोर्ट्स 18 नेटवर्कवर SD आणि HD या दोन्ही चॅनेलवर थेट प्रक्षेपित केले जाईल. यासोबतच दूरदर्शनच्या स्पोर्ट्स चॅनलवर लाइव्ह सामनेही पाहू शकता.JIO CINEMA ॲप आणि वेबसाईटवर पॅरिस ऑलिम्पिक २०२४चे लाइव्ह स्ट्रीमिंग पाहू शकता. जिओ सिनेमावर ऑलिम्पिक सामने पाहण्यासाठी वेगळा प्लॅन घेण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे ऑलिम्पिकचे सामने जिओ सिनेमावर विनामूल्य फ्री पाहता येतील.पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक २०२४ ला येत्या २६ जुलैपासून सुरूवात होणार आहे. जगभरातील अनेक उत्कृष्ट खेळाडू या मोठ्या स्पर्धेत जास्तीत जास्त पदक मिळवण्यासाठी प्रयत्न करतील. भारतीय खेळाडूंनी गेल्या काही वर्षात या सर्वात मोठ्या स्पर्धेत ज्या प्रकारची कामगिरी केली आहे, ते पाहता यंदाही खेळाडू अधिकाधिक पदके मिळवतील अशी भारतीय चाहत्यांना आशा आहे. दरम्यान, भारतातील चाहत्यांना ऑलिम्पिकचे पॅरिसमध्ये हे सामने लाइव्ह कसे पाहता येणार, असा प्रश्न पडला आहे. जाणून घेऊया याचे उत्तर...

### 26 जुलैपासून सुरुवात

ऑलिम्पिक सुवर्णविजेता नीरज चोप्रा, शटलर पीव्ही सिंधू, सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पुरुष जोडी आणि पुरुष हॉकी संघाला पॅरिसमध्ये पदक जिंकण्याची सुवर्ण संधी आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ भारतात स्पोर्ट्स 18 नेटवर्कवर SD आणि HD या दोन्ही चॅनेलवर थेट प्रक्षेपित केले जाईल. यासोबतच दूरदर्शनच्या स्पोर्ट्स चॅनलवर लाइव्ह सामनेही पाहू शकता.JIO CINEMA ॲप आणि वेबसाईटवर पॅरिस ऑलिम्पिक २०२४चे लाइव्ह स्ट्रीमिंग पाहू शकता. जिओ सिनेमावर ऑलिम्पिक सामने पाहण्यासाठी वेगळा प्लॅन घेण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे ऑलिम्पिकचे सामने जिओ सिनेमावर विनामूल्य फ्री पाहता येतील.पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक २०२४ ला येत्या २६ जुलैपासून सुरूवात होणार आहे.

फ्रान्समधील पॅरिस या जगप्रसिद्ध शहरात २६ जुलै ते ११ ऑगस्ट या कालावधीत ऑलिम्पिक २०२४ चे सामने रंगणार आहेत. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये एकूण २०६ देश सहभागी होणार आहेत. भारतीय खेळाडू यंदाही नवे विक्रम रचून जास्तीत जास्त पदके जिंकण्याचा प्रयत्न करतील. भारताच्या इतिहासात सध्या एकूण ३५ ऑलिम्पिक पदके आहेत. २००८ मध्ये बीजिंगमध्ये अभिनव बिंद्राने देशातील पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले होते. नुकतेच नीरज चोप्राने भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून सुवर्णपदकांचा दुष्काळ संपवला होता. २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये त्याने ही कामगिरी केली. ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय ॲथलिट ठरला. यंदा भारताकडे खेळाडूंचा ताफा आहे.

# श्रीलंका दौऱ्यासाठी टीम इंडियाची लवकरच घोषणा

## » कर्णधार रोहित शर्माच्या पुनरागमनाचे मोठे अपडेट

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघ जुलै अखेरीस श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यासाठी लवकरच बीसीसीआय भारतीय संघाची घोषणा करणार आहे. या दौऱ्यावर भारतीय संघात काही बदल पाहायला मिळणार आहेत. टीम इंडियाचा संपूर्ण सपोर्ट स्टाफ नवा असणार आहे. तर भारतीय संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर यांची पहिली परिक्षा असणार आहे. याबरोबरच आतापर्यंत श्रीलंका दौऱ्याबाबत बातम्या येत होत्या की कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीला विश्रांती दिली जाऊ शकते, परंतु आता रोहित शर्माच्या पुनरागमनाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.**




भारत टी-२० वर्ल्डचॅम्पियन ठरल्यानंतर विश्वचषकानंतर लगेच रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. रोहित एकदिवसीय आणि कसोटी क्रिकेटमध्ये खेळत राहणार असला तरी, रोहित शर्माच्या श्रीलंका दौऱ्यावर वनडे मालिकेत खेळण्याबाबत निश्चितता नव्हती. पण आता रिपोर्टनुसार रोहित शर्मा श्रीलंकेविरूद्धची वनडे मालिका खेळणार असल्याचे म्हटले जात आहे. भारतीय संघाचे नवीन प्रशिक्षक गौतम गंभीर यांची भारताचे सर्व दिग्गज खेळाडू म्हणजेच रोहित शर्मा, विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह यांनी तिन्ही फॉरमॅटसाठी उपलब्ध असावे, अशी इच्छा व्यक्त केली आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पूर्वी भारतीय संघ काही मोजक्या वनडे मालिका खेळणार आहे, त्यामुळे श्रीलंकेविरूद्धच्या वनडे मालिकेसाठी रोहित उपलब्ध असेल, अशी शक्यता आरोहितच्या पुनरागमनाचे कोणतेही अपडेट आले नव्हते, त्यामुळे केएल राहुलला एकदिवसीय मालिकेत कर्णधार बनवले जाऊ शकते.C

### बुमराह यांनी तिन्ही फॉरमॅटसाठी उपलब्ध

अशा बातम्या येत होत्या. पण जर रोहित शर्मा एकदिवसीय मालिकेसाठी उपलब्ध असेल तर चाहत्यांना पुन्हा एकदा हिटमॅन संघाचे नेतृत्व करताना दिसेल. विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह या दोघांनाही विश्रांती देण्यात येईल, असे अपडेट आहेत. टी-२० विश्वचषक २०२४ नंतर, रोहित शर्माने क्रिकेटमधून ब्रेक घेतला आणि सुट्टीसाठी कुटुंबासह अमेरिकेला गेला. सध्या रोहित अमेरिकेत आहे. गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेतील रोहितचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत होता, ज्यामध्ये रोहितने त्याच्या एकदिवसीय आणि कसोटी निवृत्तीवर उत्तर दिले होते.भारत टी-२० वर्ल्डचॅम्पियन ठरल्यानंतर विश्वचषकानंतर लगेच रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होतीभारतीय संघाचे नवीन प्रशिक्षक गौतम गंभीर यांची भारताचे सर्व दिग्गज खेळाडू म्हणजेच रोहित शर्मा, विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह यांनी तिन्ही फॉरमॅटसाठी उपलब्ध असावे, अशी इच्छा व्यक्त केली आहे.